**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**तक्रार क्रमांक - २००६/२५६/०२**

**श्री.विठ्ठल गोविंद झुंजुरके ,** -- **अपिलकर्ता**
**८३६,बुधवार पेठ,लक्ष्मी रोड,**
**पुणे - ४११ ००२.**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** -- **उत्तरवादी**
**सहाय्यक आयुक्त,**
**पुणे महानगर पालिका,**
**पुणे.**

**--- वि वे च न ---**

श्री.विठ्ठल गोविंद झुंजुरके हे सेवानिवृत्त कर्मचारी,पुणे महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमात कार्यरत होते. अपीलकर्ते श्री.झुंजुरके यांनी दिनांक १.३.२००६ रोजी आयोगाकडे अर्ज पाठवून त्यांच्या निवृत्ती वेतनाबाबत अनेकदा अर्ज करुन माहिती मागितली असता खरी माहिती पुरवत नाहीत व निवृत्ती वेतन प्रकरणाबाबत भरलेल्या फॉर्मच्या नकला मिळत नाहीत अशी तक्रार केली. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज केला होता किंवा नाही हे स्पष्ट होत नसल्यामुळे संबंधितांना समक्ष बोलावून प्रकरणाच्या तक्रारीची चौकशी करण्याचे ठरविण्यात आले. जेणे करुन सेवानिवृत्तीचे वेतनाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मदत होईल.

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक १७.७.२००६ रोजी पुणे येथे घेण्यात आली. त्यावेळैला अर्जदार तसेच श्री.एस.डी.राणे,व्यवस्थापक,प्रशासन व वाहतूक तसेच श्री.परदेशी,माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे निष्पन्न झाले की, श्री.झुंजुरके यांनी ज्या दिपशी आयोगाकडे तक्रार अर्ज दिला त्याच दिवशी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली पुढील माहितीची मागणी केली.

१. निवृत्ती वेतन प्रकरणी माझ्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कुटुंब निवृत्ती वेतन योजना १९७१ मध्ये भरलेल्या पेन्शन फॉर्मची प्रत मिळावी.
२. पी.एम.टी खात्याने माझ्याकडून पेन्शनबाबत फॉर्म क्र.९४४ दि.२५.३.१९८५ रोजी भरलेल्या पेन्शन फॉर्मची प्रत मिळावी.
३. दि.२५.३.१९८५ रोजी पी.एम.टी. खात्याकडे पेन्शन बाबत माझा फॉर्म भरुन दिलेला आहे. परंतु त्यासंबंधी सन १९७१ बाबत अंशदायी भविष्य निर्वाह निधी कार्यालय,पुणे यांच्याकडे पी.एम.टी. खात्याकडून झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती मिळाव्यात.
४. पी.एम.टी. खात्याने दिनांक ९.११.२००४ पीएमटी-अेअेम-३६२० रोजी दि.१५.३.२००४ चे दैनिक सकाळमधील दि.१५ मार्च २००४ चे कात्रण जोडले आहे. दैनिक वर्तमानपत्रातील बातमी - कर्मचा-याने ''पहिल्यांदा दिलेला पेन्शन योजनेचा पर्यायच अंतिम'' याबाबतचा मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबतची खरी नक्कल पुरविणेबाबत.
५. पी.एम.टी. खात्याने दि.१०.९.२००३ पीअेएमटी-अेअेम-३६१२ दि.१०.९.२००३ च्या पत्राने कळविल्यापमाणे केंद्रीय भविष्य निर्वाह निधी योजने अंतर्गत प्रॉव्हीडंट फंडाची पेन्शन योजना सुरु केली त्याबाबत सन १९९५ चा महाराष्ट्र सरकारच्या जी.आर.ची प्रत मिळावी.

वरील मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २२.३.२००६ च्या पत्राने देण्यात आलेली आहे. श्री.झुंजुरके यांचे मुख्य गा-हाणे त्यांना पुणे महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमातर्फे निवृत्ती वेतन पाहिजे आहे. पण परिवहन प्रशासनाचे म्हणणे असे की, त्यांनी केंद्रीय कर्मचारी कुटुंब वेतन योजना सन १९७१ चा पर्याय स्विकारलेला असल्याने त्यांना निवृत्त वेतन योजना लागू करता येणार नाही. निवृत्ती वेतन योजना लागू करुन घेण्याच्या प्रयत्नांत श्री.झुंजुरके यांनी

वेगवेगळी माहिती परिवहन प्रशासन विभागाकडे मागितलेली आहे. सुनावणीच्यावेळी असे दिसून आले की, काही माहिती प्रशासनाने श्री.झुंजुरके यांना इतर कार्यालयामधून घेण्याचे सांगितले होते. ही माहिती प्रशासनास का देता येणार नाही असे विचारले असता, ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे प्रशासनाने मान्य केले. श्री.झुंजुरके यांना हे ही स्पष्ट करण्यात आले की, त्यांच्या निवृत्ती वेतनाच्या विकल्पाबाबत त्यांची तक्रार असल्यास त्यांनी ती पुणे महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रम किंवा न्यायालय यांचे माध्यमातून सोडवून घ्यावी लागेल. वरील कागदपत्रे मिळवून देण्याबाबत आयुक्त व्यवस्थापक परिवहन यांना निर्देश देतील. या निर्देशाप्रमाणे पुणे महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमाने त्यांच्या दिनांक २४.७.२००६ च्या पत्राने निवृत्ती वेतनाबाबत महाराष्ट्र शासनाच्या सन १९७१, १९७५ व १९८५ च्या शासन निर्णयाच्या प्रती श्री.झुंजुरके यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच त्यांच्या विकल्पाच्या बाबतीत विस्तृत माहिती दिलेली आहे. या माहितीच्या आधारावर श्री.झुंजुरके यांनी त्यांच्या प्रश्नाची तड लावून घ्यावी.

**नि र्ण य**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(सुरेश व्ही. जोशी)**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**तक्रार क्रमांक - २००६/१८८/०२**

**श्री.संपतराव ल. सावंत ,** -- **अपिलकर्ता**
**''फिनिक्स'',५३/५ अ,शिवाजीनगर,**
**संगमनगर,सातारा.**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** -- **उत्तरवादी**
**उप संचालक,**
**नगर रचना विभाग,सातारा.**

**--- वि वे च न ---**

श्री.संपतराव सावंत यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या नमुन्यामध्ये दिनाक १७.१०.२००५ रोजी अर्ज करुन माहिती अधिकारी तथा सहा.संचााक,नगररचना,सातारा यांना पुढील विषयाबाबत माहिती विचारली.

१. खेड,ता.सातारा येथील स.नं.५३/१-३, स.नं.५३/१-२ ही एन.ए. तांत्रिकदृष्टया चुकीची तपासून दिल्यामुळे चुकीची आली आहेत व झोन प्लॅनचे रस्त्यातील तफावत दूर करणेबाबत.

२. सन २००० ते १७.१०.२००५ पर्यंत जिल्हाधिकारी,सातारा व उप संचालक,नगर रचना,पुणे विभाग यांना वरील विषयासंदर्भात पाठविलेल्या प्लॅनची दुरुस्ती करुन जिल्हाधिकारी,सातारा यांना पाठविलेल्या साईटची प्लॅन प्रत मिळणेबाबत.

यावर सहाय्यक संचालक यांनी असे कळविले की, विषयांकित बाबतचे प्रारुप, झोन प्लॅन हा जिल्हाधिकारी,सातारा यांचेकडे मंजूरीसाठी सादर केला असून त्यास अद्याप मंजूरी मिळालेली नाही. त्यामुळे विचारलेली माहिती सद्यस्थितीत देता येत नाही. वरील

माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.सावंत यांनी उप संचालक,नगररचना,पुणे विभागकडे दिनांक ७.११.२००५ रोजी अपील दाखल केले. अर्जदाराने दिनांक १७.१०.२००५ रोजीचा अर्ज हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये अर्ज केला होता. आता तो अधिनियम निरसित असल्यामुळे असे अर्ज अर्जदारांस परत करण्यात यावे व केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जे विहीत नमुने असतील त्या नमुन्यामध्ये अर्ज करण्याबाबत विनंती करण्यात यावी असे शासनाने निर्देश दिलेले आहेत.

त्याचा आधार घेऊन कोणताही निर्णय न देता अपील अर्ज दप्तरी दाखल केले व अर्जदारास नवीन अर्ज सादर करण्यास सांगण्यात आले. यामुळे व्यथीत होऊन अर्जदाराने आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये दिनाक २९.११.२००५ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

या अपीलाची सुनावणी दिनांक १२.६.२००६ रोजी विभागीय आयूत कार्यालय,पुणे येथे घेण्यात आली. त्यावेळी अर्जदार श्रीसावंत, उप संचालक,नगररचना,पुणे विभाग तसेच सहाय्यक संचालक,नगररचना,सातारा हे उपस्थित होते.

अर्जदाराचा अर्ज जरी विहीत नमुन्यात नसला तरी त्यास सहाय्यक संचालकांनी उत्तर दिलेले आहे. तेव्हा अपीलीय अधिका-यांनी पुन्हा अर्ज करावयास सांगणे हे तांत्रिकदृष्टया जरी बरोबर असले तरी अपीलाबाबत योग्य निर्णय घेणे आवश्यक होते. जिल्हाधिकारी,सातारा यांचेकडे नकाशा मंजूरीसाठी पाठवून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे सहाय्यक संचालक,नगररचना यांनी स्वतः जिल्हाधिका-यांकडे पाठपुरावा करावा व त्यांची मंजूरी घेऊन अर्जदारास लागणा-या कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

## आ दे श

वरील प्रमाणे कार्यवाही करावी. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(सुरेश व्ही. जोशी)**
**मुख्य माहिती आयुक्त**

**"माहितीचा अधिकार अधिनियम,२००५" च्या अंमलबजावणी संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या सुनावणीचे आदेश.**

**तक्रार क्र.२००६/१७८६/०२**

**तक्रारदार : डॉ. दिपा बापूसाहेब भोसले**

**विरुध्द**

**अपीलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी**

**जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर..**

I.

**--विवेचन--**

**तक्रारदार डॉ. दिपा बापूसाहेब भोसले ,तहसिलदार पुनर्वसन तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपीक , जिल्हाधिकारी कार्यालय , स्वराज्य भवन, कोल्हापूर यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी त्यांच्याकडील अपील क्र. २/२००६ मध्ये दि.१८/६/२००६ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरुध्द माहितीचा अधिकार कायदा कलम १८ अन्वये तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.**

**श्री. अयुब अकबर मुल्ला, माजी सैनिक मु.पो. भेंडवडे, ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर यांनी दि. १/१२/२००५ रोजी जोडपत्र अ नुसार दि. २६/७/२००५ ते ३/८/२००५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीत मु.पो. भेंडवडे, ता. हातकणंगले येथील गट नं. २४८ मधील शेतकरी श्री. रामचंद्र महाडीक व श्री.विश्वास बंडू कांबळे यांना शेतीचे पंचनामे होवून शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आलेली आहे परंतु त्याच गट नंबरमधील अर्जदार यांचे शेतातील पिकाचे झालेल्या नुकसानीची शासनाकडून आर्थिक मदत का मिळाली नाही १ सदर प्रकरणास जबाबदार कोण १ याबाबतची माहिती प्रमुख लिपीक कार्यासन १२ अ यांच्याकडे मागणी केली होती. त्यास अनुसरुन दि. १७/१२/२००५ रोजी तहसिलदार हातकणंगले यांनी दिलेल्या**

अहवालानुसार दि. १८/१/२००६ रोजी अर्जदार यांना कळविले होते. त्यामध्ये त्यांनी असे कळविले होते की, श्री.महाडिक व कांबळे यांच्या जमिनीतील कांही भाग पाण्याचा निचरा न होणारा व सखळ असल्या कारणाने पाणी साचून नुकसान झाले होते. त्याचा पंचनामा पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक ,कृषि सहायक व दोन पंच यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन केला होता. त्यावेळेस अर्जदार यांच्या शेतातील सोयाबीन, उडीद व तुर ही पिके उत्तम प्रतीची आढळली व पिकाचे नुकसान झाले नसलेने पंचनामा विहित नमुन्यात नसल्याने नुकसान भरपाई अदा करण्यात आली नाही असे तहसिलदार हातकणंगले यांनी कळविल्याचे सांगून अर्जदार यांना कळविले होते.

अपीलार्थी यांनी सदरची माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असून २४ दिवस विलंबाने माहिती दिल्याबाबत कसुरदार अधिका-यांवर कारवाई व्हावी म्हणून प्रथम अपीलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले. अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दि. २२/२/२००६ रोजी अपीलाची सुनावणी घेतली व जन माहिती अधिकारी यांनी दि. १२/१/२००६ रोजी अपीलार्थी यांना माहिती देणे आवश्यक होते परंतु प्रत्यक्षात दि. १८/१/२००६ रोजी पाठविली त्यामुळे ७ दिवसांचा विलंब झाला म्हणून जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांना प्रत्येक रु. ८७५/ दंडाची शास्ती लावली व दि. १८/३/२००६ रोजी अपील निकाली काढले.

तक्रारीची सुनावणी दि. २७/४/२००६ रोजी निश्चित करण्यांत आली होती. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार डॉ. दिपा भोसले त्याचप्रमाणे सौ.अलका अमर चव्हाण लिपीक जिल्हाधिकारी कार्यालय या उपस्थित होत्या. त्यांनी त्यांची लेखी निवेदने सादर केली. सौ.अलका चव्हाण, लिपीक यांनी असे नमूद केले आहे की, दि. २७ जुलै २००५ रोजी कोल्हापूर जिल्हयात अतिवृष्टी होवून मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे नुकसानीबाबतची माहिती संकलीत करुन शासनास वेळोवेळी पाठविणे, तहसिलदार कार्यालयाकडून आवश्यक अनुदानाबाबतची माहिती संकलीत करणे, अनुदान वाटप करणे. आयुक्त पुणे व महालेखापाल मुंबई यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून खर्चाचा ताळमेळ घेणे ही सर्व कामे त्यांच्याचकडे असल्यामुळे सदर माहिती देण्यास विलंब झाला.

सदरची दिरंगाई त्यांच्याकडून जाणून बुजून व हेतूपुरस्सर झालेली नाही सबब अपीलामधील शास्ती माफ करावी असे निवेदन केले आहे. डॉ. भोसले यांनी त्यांच्या निवेदनामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या कामाचा व्याप पाहता अतिशय दक्ष राहून पुरग्रस्तांना मदत, पुरग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम, पुरग्रस्तांबाबतची सर्व माहिती संकलीत करुन शासनाकडे, आयुक्त कार्यालयाकडे तांतडीने सादर केली आहे व अर्जदार यांना माहिती देण्यामध्ये जाणीवपूर्वक व कामचुकारपणा म्हणून दिरंगाई झालेली नाही, सबब प्रथम अपीलीय अधिकारी यांची दंडणीय कारवाई रदद करावी अशी विनंती केली आहे.

तक्रार अर्जासोबतचे सर्व कागदपत्र व तक्रारदार यांनी केलेल्या निवेदनाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की. अर्जदार यांना तांतडीने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी दि. १/१२/२००५ रोजी अर्ज प्राप्त होवून १७/१२/२००५ पर्यंत तहसिलदार यांच्याकडून अहवाल प्राप्त करुन घेतला आहे परंतु त्या कालावधीतील त्यांच्या कामाच्या व्याप पाहता ७ दिवसांचा विलंब झ ालेला दिसून येतो व सदरचा विलंब हा अर्जदार यांनी हेतूपुरस्सर माहिती न देण्याचा उददेश दिसून येत नाही. त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार २००५ मधील तरतुदीनुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांचेवर दंडनीय अगर इतर शास्ती लावण्याचा अधिकार प्राप्त नाही. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## *--आदेश--*

**तक्रारदार यांची विनंती मान्य करण्यांत येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे माहिती अधिकारातील अपील क्र. २/२००६ मधील दि. १८/३/२००६ रोजी पारीत केलेले आदेश रदद करण्यांत येत आहेत.**

(सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

तक्रार क्रमांक -२००६/२०५/०२

श्री. सुरेंद्र बाबुराव शिंदे -- अपीलकर्ता
द्वारा- अभय मसिह १/६, विश्रामनगर,
राजाबाक्षा पो.अजनी, नागपूर

विरुध्द

१. सचिव
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मुंबई -- उत्तरवादी
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग , मुंबई -८
२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,
नागपूर.

## वि वे च न

श्री. सुरेंद्र बाबुराव शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये दि. २०/४/२००५ रोजी त्यांच्या बडतर्फीच्या बाबतीत अर्ज केला होता व त्यांना महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने संदभार्तील माहिती दि. १०/५/२००५ रोजी दिली होती. तसेच विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ नागपूर यांनी दि. ७/१०/२००५ च्या अर्जाची माहिती दि. ३/११/२००५ रोजी दिलेली आहे.

श्रीयुत. शिंदे यांचे दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांचे प्रथम अपील (दि.३०.१२.२००५) प्रादेशिक व्यवथापक, नागपूर यांचेकडे होवून त्याचा निर्णय दि. २३/३/२००६ रोजी त्यांना प्रादेशिक व्यवस्थापक नागपूर यांनी कळविला. तरीही शिंदे यांचे समाधान न झालेले दिसत नाही. म्हणून त्यांना त्यांच्या पुढचे अपील लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य (महाराष्ट्राच्या जुन्या कायद्या प्रमाणे) यांचेकडे करण्याबाबत महामंडळाने दि. १४/२/२००६ रोजी कळविले आहे.

श्रीयुत.शिंदे यांनी एक नविन माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत एक अर्ज अपील म्हणून या आयोगाकडे दि. १५/४/२००६ रोजी पत्र पाठविले होते. अर्जदारास नेमके काय पाहिजे हे त्यावरुन कळत नसल्यामुळे या अर्ज / अपीलाची सुनावणी दि. २९ जुलै २००६ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळेला अर्जदार गैरहजर होते, पण सचिव ,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे उपस्थित होते. अर्जदारास माहितीचा अधिकार अधिनियमाखालचा अर्ज हा महाराष्ट्राच्या जुन्या कायद्याखालील जो आता निरसित झालेला आहे त्याखालील आहे व प्रथम अपीलीय अधिका-यांनी त्या कायद्याअंतर्गत अर्जदारास माहिती दिलेली आहे, तसेच त्यानेही समाधान न झाल्याने अधिनियमाच्या कायद्याखाली द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांनी मा.लोक आयुक्त यांच्याकडे अपील करण्यास जाण्याचा सुध्दा सल्ला दिलेला आहे.

सचिव, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मुंबई यांनी सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, महामंडळातर्फे जी माहिती द्यावयाची होती ती माहिती संपूर्णपणे अर्जदारास देण्यात आलेली आहे. अर्जदार यांना महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ केल्यानंतर व बडतर्फीच्या अर्जातील त्यांचे अपीलातील सर्व प्रयत्न हरल्यानंतर ते वेगवेगळया माध्यमातुन वेगवेगळे अर्ज करीत असतात. तरीही जुन्या माहितीच्या अधिकार कायद्याखाली त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. अर्जदाराचे दि. १५/४/२००६ चे अपील पाहिले असता त्यांना नेमके काय पाहिजे हे कळत नाही.

***--आदेश--***

अर्ज/अपील खारीज करण्यात येत आहे.

(सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

स्थळ-मुंबई
दिनांक - २९ जुलै २००६